# पुणे विद्यापीठ

गणेशखिंड, पुणे - ४११ ००७.

**परीक्षा परिपत्रक क्रमांक : १२९**

## विषय- खेळाडू विद्यार्थ्यांची विशेष परीक्षा.

परीक्षा परिपत्रक क्रमांक २००/२००१ (संदर्भ क्रमांक परीक्षा-समन्वय/२१९८), दिनांक २७ जुलै, २००१ मधील तरतुदीनुसार ज्या विद्यार्थी खेळाडूंची राष्ट्रीय पातळीवरील, अशियाई वा ऑलिंपिक क्रिडा स्पर्धांसाठी निवड झाली आहे. तसेच राज्यस्तरीय, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर राष्ट्रीय छात्रसेना, राष्ट्रीय सेवायोजना, वादविवाद स्पर्धा, वकृत्व स्पर्धा, नाटय, मूट कोर्टस व मा. व्यवस्थापन परिषदेने वेळोवेळी मान्य केलेल्या स्पर्धा, राष्ट्रीय शारीरिक कार्यक्षमता व पुणे विद्यापीठाचे प्रौढ शिक्षण कार्यक्रम **या स्पर्धामध्ये सहभागी होणा-या विद्यार्थ्यांचा विद्यापीठ परीक्षांचा कार्यक्रम तो भाग घेत असलेल्या स्पर्धांच्या कार्यक्रमाच्या बरोबरीने येत असेल तर अशा खेळाडू विद्यार्थ्यांची विशेष परीक्षा (Special Examination) विद्यापीठ आयोजित करते** (सोबत परिपत्रकाची प्रत).

तसेच शैक्षणिक वर्ष २००४-२००५ पासून परीक्षा परिपत्रक क्रमांक ४५६/२००४ (संदर्भ क्रमांक परीक्षा-समन्वय/१४०९) दिनांक २९.११.२००४ मधील तरतुदीनुसार आंतर महाविद्यालयीन/ आंतर विभागीय क्रिडा स्पर्धेमध्ये भाग घेणाऱ्या खेळाडू विद्यार्थ्यांच्या सत्रांत परीक्षांचा कार्यक्रम ते भाग घेत असलेल्या स्पर्धाच्या कार्यक्रमाच्या बरोबरीने येत असल्यास संबंधित विद्यार्थ्यांची विशेष सत्रांत परीक्षा संबंधित महाविद्यालय आयोजित करते. सोबत परिपत्रकाची छायांकीत प्रत माहिती व संदर्भासाठी जोडली आहे.

विद्यापीठाचा अभ्यासक्रम बदलल्यामुळे, काही विद्यार्थ्यांची एकाच दिवशी, एकाच वेळेस दोन विषयांची परीक्षा येत असल्यास सदर विद्यार्थ्यांचीसुध्दा वरील विद्यार्थ्यांच्या विशेष परीक्षेबरोबर अशी परीक्षा आयोजित करण्यात येते.

विशेष परीक्षेचे अर्ज महाविद्यालय/मान्यताप्राप्त संस्था यांनी सोबत जोडलेल्या विहीत नमुन्यातील अर्जानुसार मा. प्राचार्य/संचालकांमार्फत सदर परीक्षा संपल्यानंतर १० दिवसाच्या आत या कार्यालयास सादर करणे आवश्यक आहे. अशाप्रकारे विहीत मुदतीत प्राप्त झालेल्या अर्जानुसार सदर विद्यार्थ्यांची विशेष परीक्षा (Special Examination) वेळेत आयोजित करण्यात येईल.

मा. प्राचार्य, सर्व संलग्न महाविद्यालये /मा. संचालक, मान्यताप्राप्त संस्था यांना या परिपत्रकाद्वारे विनंती करण्यात येते की, या परिपत्रकाचा आशय सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणावा आणि योग्य ती पुढील कार्यवाही करावी.

परीक्षा नियंत्रक

सोबत : वरीलप्रमाणे

गणेशखिंड, पुणे-७.
संदर्भ क्रमांक परीक्षा-समन्वय/८६३
दिनांक: १७ ऑगस्ट, २०११
प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी-:

१. मा. प्राचार्य, सर्व संलग्न महाविद्यालये /मा. संचालक, मान्यताप्राप्त संस्था
२. मा. संचालक, महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ
३. मा. संचालक, विद्यापीठ क्रीडा मंडळ
४. मा. कुलगुरू यांचे कार्यकारी सहायक
५. उपकुलसचिव (१,२,३ व ४)
६. सहायक कुलसचिव, (शैक्षणिक)
७. परीक्षा विभागातील सर्व सहायक कुलसचिव
८. परीक्षा विभागातील सर्व कक्षाधिकारी
९. केंद्र प्रमुख, विद्यापीठ उपकेंद्र, अहमदनगर व नाशिक

**दूरध्वनी क्रमांक :**
**०२०-२५६०१२१८**
**फॅक्स : ०२०-२५६०१२०६**

# पुणे विद्यापीठ

*परीक्षा विभाग*
**गणेशखिंड, पुणे ४११ ००७**
**Website : www.unipune.ac.in**
**e-mail : coe@unipune.ac.in**

१. विद्यार्थ्याचे / विद्यार्थीनीचे संपूर्ण नांव व कायमचा पत्ता : ____________________

२. स्थानिक पत्ता (जवळच्या खुणेसह) : ____________________

३. स्थानिक घरचा दूरध्वनी क्र. : __________ मोबाईल नं. : __________
ई - मेल आयडी : __________

४. महाविद्यालय / संस्थेचे नांव व पत्ता : ____________________

५. परीक्षेचे नाव व आसन क्र. : ____________________

६. परीक्षेचा कालावधी : दि. __________ ते दि. __________

७. विशेष परीक्षेच्या विषयाचे नांव : ____________________
कोड नं. : ____________________
**[आवश्यकतेनुसार विषयांची स्वतंत्र यादी जोडावी.]**

८. विशेष परीक्षा आयोजित करण्यासाठी असलेले कारण : ____________________
ॲटेंडन्स सर्टिफिकेटच्या छायांकित सत्य प्रतीसह : ____________________

९. खेळ,कार्यक्रम इत्यादीचा प्रत्यक्ष कालावधी : दि. __________ ते दि. __________

१०. कार्यक्रम प्रवासासह कालावधी : दि. __________ ते दि. __________

११. सोबत आवश्यक असलेली कागदपत्रे : १. ॲडमिट कार्डची प्रत
(ज्या विषयाची विशेष परीक्षा घ्यावयाची आहे त्या विषयांना हायलाईट करणे आवश्यक)
२. विशेष परीक्षा घेण्यासाठी आवश्यक असलेल्या कारणाचे मूळ पत्राची प्रत
३. महाविद्यालयाच्या प्राचार्यांचे आवश्यकतेनुसार स्वतंत्र शिफारस पत्र

विद्यार्थी / विद्यार्थीनीची स्वाक्षरी : ____________________
दिनांक : ____________________

महाविद्यालयाच्या प्राचार्यांचे अभिप्राय : सदर विद्यार्थ्याने/विद्यार्थीनीने ज्या विषयांसाठी विशेष परीक्षा घेण्यासाठी विनंती केली आहे त्याची/तिची सत्यतेबाबत पडताळणी केली असून या विद्यार्थ्याने/विद्यार्थीनीने नमूद केलेले कारण ग्राह्य धरुन त्याची/तिची विशेष परीक्षा आयोजित करावी.

महाविद्यालयाचा दूरध्वनी / फॅक्स नंबर : ____________________

प्राचार्यांची / संचालकांची सही व शिक्का